**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २९.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—**

**अ)** पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत हल्ली मुक्कामी राहणाऱ्या ४० वर्षीय फिर्यादी ह्या मुलांना शाळेला सुटी असल्याने, त्यांचे दोन अपत्यांसह पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील आपल्या माहेरी मुक्कामी आल्या होत्या. दिनांक २५.०५.२०२६ चे ११.०० वा. ते १२.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांची १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तीचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तिचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, नमुद मुलगी ही ईमामवाडा परिसरात राहत आहे. अशा माहीतीवरून ईमामवाडा परीसरात जावुन, पाहणी केली असता, तेथे नमुद मुलगी ही मिळून आली. तिची सविस्तर विचारपूस करून, मुलीचे समुपदेशन करण्यात आले. मुलीस पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील कार्यवाही सुरू आहे.

**ब)** पोलीस ठाणे वाडी हद्दीत राहणाऱ्या ४० वर्षीय फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही दिनांक २४.०५.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, ‘‘वडधामणा चौकात जाऊन येते’’ असे राहते घरी सांगून, घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तिचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तिचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, नमुद मुलगी ही पोलीस ठाणे वाडी हद्दीत राहणारे तिचे आजोबा यांचेकडे राहत आहे. अशा प्राप्त माहीतीवरून पोलीस पथकाने वाडी परीसरात जावुन, पाहणी केली असता, तेथे नमुद मुलगी ही मिळून आली. तिची सविस्तर विचारपूस करून, मुलीचे समुपदेशन करण्यात आले. मुलीस पुढील कारवाईस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील कार्यवाही सुरू आहे.

वरील दोन्ही कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस

आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. ललीता तोडासे, सफौ. श्याम अंगुथलेवार, पोहवा. सुनिल वाकडे, सचिन श्रीरामे, पोअं. विलास चिंचुलकर, नरेश शिंगणे व मपोअं. अश्विनी खोडपेवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगाव :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचा मुलगा नामे आदित्य अशोक मरसकोल्हे, वय २३ वर्ष, रा. जयभीम नगर, रामेश्वरी रोड, बुध्द विहार जवळ, अजनी, नागपूर हा एअरपोर्ट पावर स्टेशन, नागपूर येथे हाऊस किपींगचे काम करीत होता व कामावर सायकलने जाणे—येणे करीत असे. दिनांक २५.०५.२०२६ चे ०५.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा सायकलने आपले कामावर जात असता, पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीत शिवणगाव फाटा, वर्धा रोड, सोनेगाव येथे एका महिंद्रा कंपनीचा तीनचाकी इलेक्ट्रीक मालवाहू ऑटो क्र. एमएच ४० बीएफ ४२५९ चा चालक नामे लक्ष्मण महादेव गुरनुले, वय २८ वर्ष, रा. खडगाव, गुमगाव, पो. ठाणे हिंगणा, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे मुलाचे सायकलला धडक दिल्याने, फिर्यादीचा मुलगा खाली पडून त्याचे डोक्याला, चेहऱ्याला व पायाला जबर मार लागून, तो गंभीर जखमी झाला. मालवाहू ऑटोचालक आरोपीने गंभीर जखमी यास उपचाराकरीता सुरूवातीला आरोग्यम हॉस्पिटल येथे दाखल केले होते. तेथून जखमी फिर्यादीचे मुलास मेडीकल हॉस्पिटल, ट्रॉमा सेंटर येथे रेफर केल्याने, उपचारादरम्यान दिनांक २८.०५.२६ चे १३.५० वा. डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अशोक शालिकराव मरसकोल्हे, वय ५७ वर्षे, रा. जयभीम नगर, रामेश्वरी रोड, बुध्द विहार जवळ, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. पंडीत पवार ९६०४६२३५३४ यांनी मालवाहू ऑटोचालकाविरूध्द कलम २८१,१०६ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०५.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्यीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, दाभा चौक ते भिवसनखोरी वस्तीकडे जाणारे रोडवर वय अंदाजे २० ते २५ वर्ष वयोगटातील तीन ईसम चाकू बाळगून आहेत. अशा माहितीवरुन तेथे जाऊन, परिसरात पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचे तीन ईसम संशयीतरित्या पायी फिरतांना दिसून आले. त्यांना स्टॉफचे मदतीने ताब्यात घेऊन, त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी आपली नावे १) पंकज धमेंद्र दमाहे, वय २४ वर्ष, रा. गणेश नगर, दाभा, चंदू तागडेच्या घरी किरायाने, गिट्टीखदान, नागपूर २) अहमद करुद्यीन खान, वय २१ वर्ष, रा. साई नगर, दाभा, प्लॉट क्र. ५९, पाण्याचे टाकीजवळ, वाडी, नागपूर ३) सनी महिपाल चौव्हान, वय २२ वर्ष, रा. गणेश नगर, दाभा, प्लॉट क्र. ८१, बसस्टॉप समोर, गिट्टीखदान, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे ताब्यात पॅन्टचे आंत कंबरेत ०१ लोखंडी कोयता किंमती २००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सफौ. अनिल त्रिपाठी येथे दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे मपोउपनि. सुप्रिया पुंडगे ९५११८०९९७९ यांनी आरोपींविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :—** दिनांक २८.०५.२०२६ चे १८.०६ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, पंचशील नगर रोड, मुस्लिम कब्रस्तान जवळ, नन्हे पान पॅलेस समोर एक अनोळखी पुरुष ईसम अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा गोल, उंची ५ फुट ३ इंच, डोक्याचे केस पांढरे व वाढलेली, दाढी—मिशी काळी व पांढरी, अंगात गुलाबी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा फुलपॅन्ट तसेच, गळ्यात मळकट पांढरा रुमाल अशा वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळून आले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. वरील वर्णनाचे मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी नापोअ. अनिल धुळे यांनी दिलेल्या सुचनेवरून, पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. राजेंद्र जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :—** फिर्यादी यांचे वडील नामे ईश्वर पंजाबराव ढेपे, वय ५५ वर्ष, रा. एस.आर. पी.एफ. कॅम्प, गट क्र. ४, नवीन क्वॉर्टर, एम.आय.डी.सी., नागपूर हे इलेक्ट्रीशियनचे काम करीत असे. दिनांक २८.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील हे पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, एस. आर.पी.एफ. कॅम्प येथील नवीन क्वॉर्टर परिसरात विद्युत खांबावर इलेक्ट्रीकचे काम करण्यासाठी चढले असता, त्यांना इलेक्ट्रीक करंट चा झटका लागल्याने ते खांबावरुन खाली पडून गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी शुभम ईश्वर ढेपे, वय ३२ वर्षे, रा. एस.आर.पी.एफ. कॅम्प, गट क्र. ४, नवीन क्वॉर्टर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि. अक्षय गावंडे ८२०८०२७३९४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे नंदनवन :—** कु. खुशी नरेंद्र मिश्रा, वय १८ वर्षे, रा. हिवरी नगर, देवी मंदीर जवळ, नंदनवन, नागपूर ही दिनांक २४.०५.२०२६ पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, अंगात— निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट व टॉप घातलेले आहे. भाषा— मराठी व हिंदी बोलते.



खुशी

**स्वा/—**

**( राहुल रोटे )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**